# मिसेस् आनि बिझांट आणि

# कृष्णमूर्ति प्रकरण.

लेखक—सदाशिव.

प्रकाशक व मुद्रक

शंकर नरहर जोशी.

" चित्रशाळा प्रेस,"

सदाशिव पेठ ८१८ पुणें—सिटी.

सन १९१३ इ.

# मिसेस् बिझांट आणि
# कृष्णमूर्ति प्रकरण.

## 'थिऑसॉफी' तील अवतारप्रवर्तन.

जगांतील निरनिराळे धर्म हे अज्ञानापासून उत्पन्न झालेले नसून ज्ञानापासून जन्म पावलेले आहेत, सर्व धर्मांच्या मूळ प्रवर्तकांनीं स्थापिलेल्या व प्रतिपादिलेल्या तत्त्वांत साम्यच नव्हे तर ऐक्यही आहे आणि वरवरचे मतभेद व स्थलकालादि भेदामुळें झालेले फरक बाजूला सारून सर्व धर्मांतील ज्ञान-भाग सर्वांनीं ग्रहण करणें इष्ट होय, असें प्रतिपादन करणाऱ्या 'थिऑसॉफिकल सोसायटी' चें एक मुख्य ठाणें अड्यार (मद्रास) येथें व दुसरें मुख्य ठाणें बनारस (काशी क्षेत्र) येथें आहे हें सर्वविश्रुतच आहे. या दोन ठिकाणांहून थिऑसॉफी' चें प्रवर्तन सबंध हिंदुस्थानांत व हिंदुस्थानाबाहेरही आज कित्येक र्षे चालू आहे; आणि पर. मॅडम् ब्लॅव्हॅट्सकी, पर. कर्नल आल्कॉट व मिसेस् ॲनि बिझांट यांच्या भाषणांनीं, लेखांनीं, व इतर खटपटींनीं 'थिऑसॉफी' या पंथाची बरीच चलतीही झाली आहे. इंग्रजी भाषेच्या व तद्वारा नवनव्या शास्त्रीय शोधांच्या व तत्त्वांच्या ज्ञानांनीं ज्यांची आपल्या धर्मावरील श्रद्धा उडून गेली होती व आनुवंशिक संस्कारानें कोणत्या तरी धर्मपर पंथांत जाण्याची यांच्यांतील प्रवृत्ति मात्र कायम होती अशा इंग्रजी शिकलेल्या अर्धवट नास्तिक हिंदी लोकांना इंग्रजी भाषेंत, इंग्रजी थाटांत, इंग्रजी किंवा युरोपियन माणसांनीं प्रतिपादिलेली 'थिऑसॉफी' फार पटली, निदान रुचली किंवा आवडली, तर यांत कांहीं नवल नाहीं. धडधडीत नास्तिक म्हणवावें तर आनुवंशिक संस्कार तक्रार करूं लागले व पूर्वींप्रमाणें धर्मावर श्रद्धा ठेवून धर्मनिष्ठ रहावें तर इंग्रजी शिक्षणानें तें शक्य राहिलें नाहीं, तेव्हां धर्माचीं मूलतत्त्वें अर्वाचीन तर्कशास्त्रानें

योग्य ठरविण्यास पुढें आलेल्या ' थिऑसॉफी ' ला बिलगावें असें कित्येक हिंदी सुशिक्षितांस साहजिकच वाटलें. ' तुम्ही कोणत्याही धर्मांतले असा किंवा कोणत्याही धर्मांतले नसा, तुम्ही श्रद्धाळू असा कीं शंकेखोर असा, धर्म संबंधींचे ग्रंथ व त्यांतील तत्त्वें यांच्या अध्ययनाची जिज्ञासा तुमच्यांत असली म्हणजे झालें; सत्य हाच आमचा धर्म व हें सत्य सर्व धर्मांत आहे अशा बुद्धीनें त्याचा सर्वत्र शोध करणें हेंच आमचें कर्तव्य असें आम्ही समजतों, तेव्हां एवढें तुम्हांस मान्य असलें म्हणजे झालें, ' अशा अर्थाची उदार विचारसरणी ऐकून अस्वस्थ मनाच्या सुशिक्षितांना या पंथांत जाणें साहाजिकच इष्ट वाटलें. पण, मूळधर्म चांगला असला तरी त्याचें प्रवर्तन करणारांतील दोषामुळें जसें त्याचें स्वरूप पुढें दूषित होतें–ही गोष्ट ' थिऑसॉफिस्टां ' नाही मान्य आहे–त्याचप्रमाणें ' थिऑसॉफी ' पंथाचीं तत्त्वें मूळ जरी चांगलीं व उद्देश जरी पटण्यासारखा असला तरी तिचें स्वरूप तिच्या प्रवर्तकांनीं पुढें दूषित केलें, आणि हळू हळू कोणत्याही धर्मपंथांत दिसून येणारे दोष या पंथांतही दिसून येऊं लागले. आणि यांत नवलही नाहीं. कारण धर्म झाला तरी तो मानवच सांगणार व धर्मपंथ झाला तरी तो मानवच चालविणार; आणि मानवांत दोष हे असावयाचेच; तेव्हां मानवांनीं चालविलेल्या ' थिऑसॉफी ' च्याही पंथांत दोष राहिले व वाढले तर त्यांत अस्वाभाविक असें कांहींच झालें नाहीं. पण, सत्य व ज्ञान यांचा शोध लावूं इच्छिणारानें अनुभव, तर्क व धर्मग्रंथ या तीनहीं सहाय्यांनीं तो शोध करावा, असें मानणाऱ्या लोकांस सुधारलेल्या व सुशिक्षित ' थिऑसॉफिस्टां ' च्या अंध श्रद्धेबद्दल वाईट वाटल्यास तेंही असाहजिक नाहीं. आंधळ्या श्रद्धेच्या नादीं लागलेले लोक अविवेकाच्या उतरणीवरून घसरूं लागले म्हणजे कसे घसरूं लागतात; आणि बुद्धिवान्, धूर्त, कर्तबगार व महत्त्वाकांक्षी धार्मिक पुढाऱ्यांच्या चरणीं लागणारा शिष्यवृंद कधीं कधीं कसा बेहोष होतो, हें ज्यास पहावयाचें असेल त्यानें मिसेस आनि बिझांट यांजवर मद्रास हायकोर्टांत जो खटला चालला व ज्या खटल्यांत जस्टिस बेकवेल्ल यांनीं मिसेस आनि बिझांट यांचे विरुद्ध निकाल दिला त्या खटल्याची व त्यामुळें बाहेर आलेल्या कित्येक गोष्टींची माहिती अवश्य करून घ्यावी. या संबंधीची साद्यंत हकीकत किंवा माहिती देणें आम्हांस शक्य नाहीं; तरी या प्रकरणाची त्रोटक हकीकत व या

अद्भुत रसानें भरलेल्या नाटकांतील मुख्य पात्रांचे फोटो आम्ही आमचे वाचकांस आज सादर करीत आहों.

## मिसेस आनि बिझांट.

मिसेस् आनि बिझांट म्हणजे कांहीं लहानसहान प्रस्थ नाहीं. आकर्षक चेहेरा, वक्तृत्वपूर्ण वाणी, उद्योगपूर्ण आयुष्यक्रम, विलक्षण बुद्धिमत्ता व असाधारण कर्तबगारी अंगीं असलेल्या या बाईनें युरोप व अमेरिका खंडांतील लोकांनाही हालवून सोडलें. नास्तिक व ' सोशियॅलिस्ट म्हणून सुधारलेल्या राष्ट्रांतही गाजलेल्या या स्त्रीनें एकदम धर्मनिष्ठ बनून भगवीं वस्त्रें घेतलीं व हातांत रुद्राक्षमाला धारण करून धार्मिक तत्त्वज्ञान सांगण्यास प्रारंभ केला तेव्हां जग थक्क झालें; व ती हिंदुस्थानांत येऊन हिंदुधर्माची महती गाऊं लागली तेव्हां कित्येक हिंदी सुशिक्षित ' योगिनी ' ' योगिनी ' म्हणून तिच्या चरणीं लीन झाले. बाईच्या आगमनाचीं व गमनाचीं वर्णनें, त्रोटक व सविस्तर चारित्रें, व्याख्यानें व संवाद, चित्रें व उपदेश हिंदुस्थानांत प्रसिद्ध होऊन प्रसार पावले; आनि बिझांटबाई म्हणजे शंकराचार्य किंवा पोप यांच्यासारखी एक धार्मिक बाबतींत विशेष अधिकारी अशी स्त्री मानण्यांत येऊं लागली. ही बाई आमच्या देशांत जन्म पावलेली नाहीं, ही बाई आमच्या जातींतली नाहीं किंवा आमच्या समाजांतील नाहीं, तरी पण आमच्या समाजांतील सुशिक्षित वर्गाच्या मनावर या बाईचा इतका पगडा बसलेला आहे कीं, तिच्या उपदेशांकडे व हालचालींकडे दुर्लक्ष करणें बिलकुल योग्य होणार नाहीं. धर्माच्या साम्राज्यांत राज्ञीपदावर आरूढ होऊन श्रद्धाळू शिष्यवृंदाला स्वेच्छेप्रमाणें नाचविण्यास ह्या बाईनें प्रारंभ केला आहे; एवढेंच नव्हे तर नव्या अवताराच्या गोष्टी सांगून भोळ्या लोकांना झुलविण्यासही आतां सुरुवात झाली असून आपल्या दुराग्रहानें आपल्या ' सोसायटी ' च्या अब्रूसही कमीपणा येऊं देण्यास ही बाई तयार झाली आहे. धर्माच्या उच्च वातावरणांतून राजकारणाच्या त्या मानानें दूषित वातावरणांत शिरण्यास बाईला दिक्कत वाटलेली नाहीं; आणि राजकारणांतील लंडावीचें अवलंबन करून बाईनीं आपल्या प्रतिपक्षीयांच्या अंगावर घाण उडविण्यासही कमी केलेलें नाहीं. अशा या बाईची पूर्वीची थोडीशी हकीगत सांगावयाची म्हणजे, १८८९ सालीं ' थिऑसॉफिकल

सोसायटी ' च्या त्या सभासद झाल्या. १८९५ सालीं, 'सोसायटी'चें काम करण्याकरितां हिंदुस्थानांत आल्या, आणि मोठी खटपट करून १९०७ सालीं 'सोसायटी'च्या अध्यक्षाचे जागीं त्यांनीं आपली निवडणूक करून घेतली. ' सोसायटी' चे उत्पादक व अध्यक्ष कर्नल आल्कॉट यांचे वेळेपासून अड्यार हें ' सोसायटी'चें मुख्य ठाणें झालें. जगांतील एकंदर ' थिऑसॉफिस्टांची संख्या सुमारें २४००० असून त्यांतील ५००० हिंदुस्थानांतले आहेत. अड्यार येथें बरीचशी जमीन, कित्येक इमारती व बागा ' सोसायटी ' च्या मालकीच्या आहेत.'सोसायटी ' च्या अध्यक्षाशिवाय सुमारें ५० यूरोपियन व अमेरिकन आणि ४० हिंदी ' थिऑसॉफिस्ट ' अड्यार येथील आश्रमांत राहतात. सोसायटीं ' त एक ' ईझॉटेरिक सेक्शन ' नांवाचें अंतर्मंडळ असून थिऑसॉफी ' प्रणित गुह्य ज्ञानाचीं अधिकारी माणसेंच तेवढीं या मंडळांत घेतलीं जातात. या मंडळांतील अधिष्ठात्री देवता किंवा गुरुमाता मिसेस् आनि बिझांट याच असून या अंतर्मंडळांत सुमारें ३००० माणसें आहेत.

## मि. सी. डब्ल्यू लेडबीटर.

मि. सी.डब्ल्यू.लेडबीटर हे मिसेस् आनि बिझांट यांच्या खांद्याला खांदा लावून ' सोसायटी ' चें काम करणारे एक गृहस्थ असून यांचें वास्तव्य अड्यार येथील ' सोसायटी 'च्या आश्रमांतच असतें. हे सांप्रत बिझांटबाईचा उजवा हातच आहेत म्हटलें तरी चालेल. हे गृहस्थ मूळ'चर्च ऑफ इंग्लंड'मधील पाद्री होते;पण तें काम त्यांनीं सोडून दिलें. १८८४ सालीं मॅडम् ब्लॅव्हॅटसकी यांची भेट झाल्यावर त्यांचेबरोबर हे हिंदुस्थानांत आले होते.बुद्धाचे अनुयायी म्हणून कांहीं वर्षें हे सिलोनमध्यें शिक्षणाचें काम करीत होते. मि. लेडबीटर हे इंग्लंडांत आल्यावर ' सोसायटी ' च्या ब्रिटिश शाखेचे ' प्रेसिडेन्शिअल् डेलिगेट ' असतांना, तरुण पोरासंबंधींचे कांहीं आरोप त्यांच्यावर उघडपणें करण्यांत येऊन इंग्लंडांत ' थिऑसाफिस्टां ' च्या एका कमिटीपुढें या घाणेरड्या आरोपाची चौकशी व चर्चा झाली. कमिटीचें काम सुरू होण्यापूर्वींच साहेबांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला; आणि कमिटींतील ६ सभासद ' राजीनामा मान्य न करितां याला सोसायटींतून हांकून लावा, असें म्हणत होते व सहा सभासद राजीनामा मान्य करावा म्हणत होते, अशा

स्थितींत कर्नेल आल्कॉट यानीं राजीनामा मान्य करण्यास आपली अनुमति देऊन तो मान्य केला. कर्नेल आल्कॉट ह्यात असतांना मिसेस् आनि बिझांट यांनीं लेडबीटर यांच्या कृत्यांचा निषेधच केला होता. 'वयांत न आलेल्या मुलांना मि. लेडबीटर यांनीं जो उपदेश केला. तो विवाहसंबंधाच्या, मातृपदाच्या व पितृपदाच्या पवित्र ध्येयास गलिच्छ करणारा, मनुष्याची कल्पना दूषित करणारा, मनोवृत्ति बिघडविणारा व शरीरप्रकृतीचा नाश करणारा असून, या उपदेशाचा धिःकार करावा तितका थोडाच होईल,' असें खुद्द मिसेस् बिझांट यांनीं एका पत्रांत लिहिलेलें आतां प्रसिद्ध झालें आहे. पण कर्नेल आल्कॉट वारल्यावर मि. लेडबीटर यांना पुनः 'सोसायटीं'त घेण्याचा प्रयत्न झाला व मिसेस् बिझांट यांच्याच सहाय्यानें, तोंड लपवीत फिरणाऱ्या लेडबीटरसाहेबांचा पुनः एकदां 'सोसायटीं'त प्रवेश झाला; एवढेंच नव्हे तर त्यांची अड्यार येथें प्रतिष्ठापना होऊन त्यांचे ग्रंथ व त्यांचे विचार बिझांटबाईंना मान्य झाले; आणि साऱ्या जगास बाजूला सारून लेडबीटरसाहेबांस पाठीशीं घालून त्यांचें महात्म्य बिझांट-बाई आतां वर्णन करीत आहेत. लेडबीटरसाहेबांनीं बाईला काय मोहनी घातली आहे कोण जाणे, एवढें खरें कीं, त्यांचे पायीं नुसता बाईसच कमीपणा येऊन राहिला नसून खुद्द 'सोसायटी'च्याही अब्रूस कमीपणा आलेला आहे. यांतच खटल्याचें मूळ आहे; पण त्यासंबंधानें लिहिण्यापूर्वी कृष्णमूर्तीसंबंधानें प्रथम माहिती देणें अवश्य आहे.

## जे. कृष्णमूर्ति.

मि. गिडु नारायणय्या नांवाचे एक पेन्शनर गृहस्थ 'सोसायटी'चे सभासद झाले होते. त्यांना बरींच मुलें झालीं. त्यांत जे. कृष्णमूर्ति (जन्म–ता. ४ मे १८९५) व नित्यानंद (जन्म—१८९८) हीं दोन मुलें होतीं. पेन्शन घेऊन आळसांत काळ घालविण्यापेक्षां राहिलेलें आयुष्य कांहीं तरी चांगल्या कामांत काढावें म्हणून यांनीं 'सोसायटी'ची सेवा करावयाचें ठरविलें; आणि त्याप्रमाणें मिसेस आनि बिझांट यांना कळविलें असतां 'सध्या माणसाची जरूरी नाहीं,' असें यांना उत्तर मिळालें; पण मागाहून (२३ जाने. १९०९) मि. नारायणय्या यांना 'ईझॉटेरिक सेक्शन'च्या असिस्टंट सेक्रेटरी'चे जागेवर

नेमण्यांत आलें; व तदनुसार ते आपलीं मुलेंबाळें घेऊन ( त्यांची पत्नी १९०५ सालींच निवर्तली होती ) अड्यार येथील ' सोसायटी ' च्या आश्रमांत रहावयास आले. कृष्णमूर्ति व नित्यानंद हीं दोन्ही मुलें आश्रमाबाहेरील मैलापूर येथील शाळेंत जात असत. पण लेडबीटरसाहेबांची दृष्टि एकदां या मुलांवर गेली, आणि त्यांनीं एके दिवशीं या मुलांना आपल्याबरोबर पोहायला म्हणून नेलें. नंतर कृष्णमूर्तीला घेऊन येण्यास सांगितलें असतां नारायणय्या त्याला घेऊन आला, तेव्हां त्याला आपल्याजवळ कोचावर बसवून व त्याच्या डोक्यावर हात ठेवून लेडबीटरसाहेब भडाभड त्याच्या पूर्वजन्मांचीं वर्णनें सांगूं लागले. ' कृष्णमूर्ती ' ला ' आल्सियॉन ' हें प्राचीन नांव देण्यांत आलें; आणि तो ख्रिस्तापूर्वी २१.४६७ व्या वर्षीं जन्मला तो राजा ' लियो ' याचा मुलगा होता, त्याची आई म्हणजे ' ओरायन, ' त्यानें एका राजाच्या ' हेरिक्लिस ' नांवाच्या मुलीबरोबर लग्न लाविलें, त्याला नऊ मुलें झालीं, वगैरे भूतकथा सांगून मि. लेडबीटर यांनीं भोळवट नारायणय्याला गुंगविलें. शनिवारीं-रविवारीं कृष्णमूर्ति लेडबीटरसाहेबांकडे नित्य भेटावयास जाऊं लागला व साहेबांचें भूतकथनही चालू राहिलें. पुढें एक दिवस साहेब नारायणय्यांना म्हणाले:— ' मुलांना त्या मैलापूरच्या शाळेंत कशाला पाठवितां ? तेथें कृष्णमूर्तीच्या दिव्य ( आस्ट्रल ) शरीराला इजा होईल. शिक्षणाचेंच म्हणाल तर तुमच्या मुलांना मी शिकवीन ' आणि त्याप्रमाणें व्यवस्था होऊन बिझांटबाईनाही ती मान्य झाली. " कृष्णमूर्ति यांच्या शरिरांत सूर्य–मैत्रेय, ख्रिस्त व ' सूर्य ' एकच असें यांचें म्हणणें–प्रवेश करणार आहे, " असें खुद्द ' थिऑसॉफिस्ट ' मासिकांत प्रसिद्ध झालें. १९१० सालीं कृष्णमूर्तीच्या ' इनीशिएशन ' नांवाच्या प्रवेश-समारंभाचा विधि झाला. पण दरम्यान लेडबीटरसाहेब आपल्या मुलाबरोबर कांहीं दुष्कृत्य करीत असल्याचें दृष्टीस पडल्यामुळें ( असें नारायणय्याचें म्हणणें ) नारायणय्या आपलीं मुलेंबाळें घेऊन अड्यार येथून निघून जाऊं लागले. पण मिसेस आनि बिझांट या तेव्हां विलायतेस होत्या. त्यांच्या गैरहजेरींत नारायणय्यांनीं अड्यार येथून निघून जाणें बरें नाहीं असें सर एस्. सुब्रह्मण्य आय्यर, ' सोसायटी'चे उपाध्यक्ष, यांचें म्हणणें पडलें; आणि त्यांच्या शब्दास मान देऊन नारायणय्या अड्यार येथेंच राहिले. ता. २९ एप्रिल १९१० रोजीं मिसेस् बिझांट अड्यार येथें येऊन दाखल झाल्या; आणि

पुनः अड्यार येथून प्रवासास निघाल्या त्या नारायणय्यांचीं मुलें आपल्याबरोबर घेऊन निघाल्या. त्या व मुलें ता. २१ नोव्हें. १९१० रोजीं अड्यार येथें परत आलीं; मध्यंतरीं पुनः मुलांसह एक महिना त्या ब्रह्मदेशांत गेल्या होत्या; आणि मग मार्च महिन्यांत बनारस येथें जाऊन त्या मुलांना घेऊन यूरोपांत चालल्या झाल्या. १९१० च्या डिसेंबर महिन्यांत अड्यार येथें ' थिऑसॉफिस्टां'ची ' कन्व्हेन्शन् ' भरली होती. तेव्हां ' आल्सिऑन ' नें लिहिलेला प्रासादिक ग्रंथ म्हणून एक ' ॲट् धि फीट ऑफ धि मास्टर ' नांवाचें पुस्तक फार प्रसिद्धीस आलें. या पुस्तकाच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आणि मिसेस् बिझांट हें पुस्तक ' ईझॉटेरिक स्कूल 'ला शिकवूंही लागल्या होत्या. कृष्णमूर्ति हा मैलापूरच्या शाळेंत मंदबुद्धीचा म्हणून प्रसिद्ध होता, इंग्रजीचें त्याचें ज्ञान बुटलेराइतपतही नव्हतें, अशा स्थितींत ' मास्टरां'च्या अनुज्ञेनें कृष्णमूर्तीनें हें पुस्तक लिहिलें, ही गोष्ट कित्येक श्रद्धाळू भाविकांना देखील पटेना; व त्याबद्दल वर्तमानपत्रांत चर्चा सुरू झाली. कर्नल आल्कॉट यांच्या मानास पात्र झालेले व अड्यार येथील ' थिऑ-सॉफिस्टां'ना नेहेमीं औषधें देणारे डॉ. नाजुंडाराव यांनीं या पुस्तकासंबंधानें चर-चरीत टीका केली व हें पुस्तक दुसऱ्या कोणीं लिहून कृष्णमूर्तीच्या नांवावर तें छापलें आणि यांत कृष्णमूर्तीचें उगाच माहात्म्य वाढविण्याचा हेतु आहे अशी सडकून टीका सुरू झाली.

## अवतार-प्रवर्तन.

बिझांटबाई विलायतेहून नारायणय्यांना पत्रें लिहून मुलांच्या संबंधानें वर्तमान कळवीत असत. " तुमच्या मुलांना बसायला येथें मोटार आहे. त्यांना मुद्दाम निरनिराळ्या शिक्षकांकडून ' सँडो'च्या व्यायामपद्धतीचें शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे, ' कृष्णा हा विलक्षण मोठा धर्मगुरु होईल, ' असें मिसेस् सिनेट म्हणतात. " असा मजकूर या पत्रांत होता. पुढें हिंदुस्थानांत परत आल्यावर त्या मुलांसह १९११ सालच्या डिसेंबर महिन्यांत बनारस येथील कन्व्हेन्शन'ला गेल्या. दरम्यान कृष्णमूर्तीच्या नेतृत्वाखालीं म्हणून ' धि ऑर्डर ऑफ धि स्टार इन् धि ईस्ट ' नांवाची एक शाखा किंवा पंथ अस्तित्वांत असल्याचें जाहीर झालें आणि ' कन्व्हेन्शन ' झाली तेव्हां या ' ऑर्डर ' संबंधानें, ' सेंट्रल हिंदू

कॉलेज'चे प्रि. अरुंडेल यांनीं एक व्याख्यान दिलें, लागलीच या पंथांत नवीन 'थिऑसॉफिस्ट' सामील होऊं लागले; आणि या नव्या लोकांना पंथाचीं 'सर्टिफिकिटें' खुद्द त्या पंथाचे मुख्य म्हटलेले कृष्णमूर्ति यांनींच जातीनें द्यावीं, असेंही हळूच सुचविण्यांत आलें. लागलीच त्या दिवशींच सायंकाळचा बेत ठरविण्यांत आला. कृष्णमूर्तीजवळ प्रो. तेलंग यांनीं उभें रहावें, दरएका नव्या सभासदानें आपलें सर्टिफिकेट घेऊन समोर येऊन तें प्रो. तेलंगांच्या हातांत द्यावें, त्यांनीं तें कृष्णमूर्तींच्या हातांत द्यावें व त्यानें तें पुनः सभासदाला परत द्यावें, असा दरबारी प्रकार चालला. या प्रसंगीं प्रथम मिसेस् बिझांट यांचें भाषण झालें होतें; नंतर 'थिऑसॉफिस्ट' मासिकांत या प्रसंगाचें वर्णन त्यांनींच मोठ्या बहारीचें केलें. "सर्टिफिकिटें देण्याचा विधि सुरू झाला तेव्हां एकदम सबंध वातावरण बदलून गेलें, दिवाणखान्यांतील वातावरणांत विलक्षण आंदोलनें–'व्हायब्रेशन्स'–सुरू झालीं; कृष्णमूर्तींच्या नाजूक व सुंदर बाल्वेहेऱ्यावर विलक्षण अधिकाराचें तेज आलें आणि त्याचा परिणाम सर्टिफिकिटें घेण्याकरितां येणाऱ्या आबालवृद्ध हिंदी, यूरोपिअम व अमेरिकन स्त्री-पुरुष सभासदांवर होऊन, आदरानें कंपायमान होणाऱ्या आपल्या हातांनीं त्यांनीं तीं सर्टिफिकिटें ग्रहण केलीं. सर्टिफिकिटें ग्रहण करितांना कृष्णमूर्तींचा आशीर्वाद घेण्याकरितां प्रत्येकानें आपलें शिर त्यांचे पायाशीं मोठ्या आदरानें नमविलें. कृष्णमूर्ति यांनींही शांतपणाचें दर्शक पण उच्च प्रतीचें स्मित करून आपले हात आशीर्वाद देण्यास पुढें केले. या वेळीं अतींद्रिय ज्ञान असलेल्यांना काय दिसलें हें सांगण्याचा हा प्रसंग नव्हे; पण एवढें खरें कीं, आपण एखाद्या साध्या ब्राह्मण तरुणापुढें उभें नसून परमेश्वराचें अधिष्ठान ज्यांत आहे अशा विभूतीपुढें आपण आहों, असें सर्वांसच वाटल्याशिवाय राहिलें नाहीं." वगैरे वर्णन बिझांटबाईंनीं केलेलें आहे. नवीन अवतार होणार आहे व त्यासाठीं पूर्वतयारी करून सज्ज असण्याकरितां ही 'ऑर्डर' निघाली असून अवताराच्या आगमनासंबंधानें ज्यास विश्वास वाटत असेल अशा कोणत्याही इसमास तींत सामील होतां येतें. पण बनारस येथें कृष्णमूर्तींचें माजविलेलें स्तोम, भावी अवताराचें स्थान म्हणून त्याच्यासंबंधानें केलेली प्रसिद्धि, विलक्षण गुणांचा त्याचेवर करण्यांत आलेला आरोप, वगैरेंमुळें कित्येक विचारी 'थिऑसॉफिस्टां'ची बिझांटप्रभृति मंडळीसंबंधाची पूज्य बुद्धि डळमळूं लागली. 'थिऑसॉफिकल

सोसायटी ' च्या हिंदी शाखेचे चिटणवीस व ' सेंट्रल हिंदू कॉलेज'च्या '' बोर्ड ऑफ टस्ट्रीज ' चे चिटणवीस बाबू भगवान दास हे मिसेस बिझांट यांना अत्यंत पूज्य मानून त्यांच्या हाताखालीं कित्येक वर्षें ' थिऑसॉफी'चें काम करीत आलेले–बिझांटबाईला ' मातोश्री ' म्हणून संबोधणारे–पण त्यांना देखील हें अवतार उबविण्याचें कृत्य पचेनासें झालें; व त्यांनीं लखलखीत याविरुद्ध लेख लिहिण्यास प्रारंभ केला. असो.

## खटल्याचें मूळ.

' बनारस येथें मीं बिझांटबाईना सांगितलें कीं, माझीं मुलें लेडबीटर यांच्या संगतीला रहातां कामा नये,' असें नारायणय्यांचें म्हणणें आहे. ता. ६ जानेवारी १९१२ रोजीं नारायणय्या यांनीं बिझांटबाईना एक पत्र लिहिलें. त्यांत ते म्हणतात कीं, मीं स्वतः अड्यार येथें लेडबीटरसाहेबांच्या खोलींत काय पाहिलें हें मीं तुमच्या निदर्शनास यापूर्वीं अनेकदां आणिलें आहे; त्याचप्रमाणें लेडबीटर यांची कामवासना ही अत्यंत हलक्या प्रकारची असून ती तृप्त करण्याचे त्यांचे मार्ग असामान्य आहेत, हेंही मीं तुम्हांस स्पष्टपणें सांगितलेलेंच आहे. दुसऱ्या एका इसमानें पाहिलेल्या प्रकारासंबंधानें कांहीं गृहस्थांजवळ जो मजकूर सांगितला तोही तुमच्या कानावर गेला असल्याचेंही मला समजलें आहे. आतां माझीं मुलें लेडबीटर यांच्यापासून दूर ठेवा अशी विनंती मीं तुमचे जवळ अनेकदां केली; पण ती मान्य केली असें म्हणूनही ती पूर्णपणें कृतींत आणीत नाहीं. तेव्हां आतां मी अखेरची विनंती करितों कीं, त्या माणसापासून माझ्या मुलांना वेगळें ठेवा. दिवसा किंवा रात्रौ माझ्या मुलांवर त्याचें वर्चस्व कोणत्याही प्रकारें होऊं देऊं नका, एवढेंच नव्हे तर माझ्या मुलांची व त्याची भेट देखील होऊं देऊं नका, त्यांच्यांतील पत्रव्यहारासही मनाई करा. नाहीं तर–मी धमकी देण्याच्या उद्देशानें बिलकुल लिहीत नाहीं–पिता या नात्याचें माझें कर्तव्य मी करीन. मि. लेडबीटर याचें कृत्य नैतिक दृष्ट्या तर दूषणावह आहेच; पण शिवाय तो हिडिस्स स्वरूपाचा गुन्हा असून फौजदारी कायद्यांत त्याबद्दल शिक्षा सांगितलेली आहे. तेव्हां माझ्या नाजुक व सुंदर मुलांसंबंधानें तसला गुन्हा तुम्ही होऊं देणार नाहीं अशी मला खात्री वाटत आहे. माझी विनंती मान्य न झाल्यास

कायद्याचा अवलंबन करावयाचा असा माझा निश्चय झालेला आहे. तुमच्याखेरीज दुसऱ्या कोणातर्फे या गोष्टीस इलाज करावयास जाणें म्हणजे माझीच नव्हे तर माझ्या मुलांची कायमची अपकीर्ति करून घेणेंच आहे. पण, लेडबीटरसारख्या जुन्या गुन्हेगाराच्या ताब्यांत मुलें राहिल्यानें त्यांचा सत्यनास होईल असें मला खात्रीपूर्वक वाटत असल्यामुळें हा स्वार्थत्यागही करावयास मी सिद्ध झालों आहें दयापूर्ण देव तुम्हांस मजवर दया करण्याची बुद्धि देवो " यावर मिसेस आनि बिझांट यांनीं मुलांना हिंदुस्थानांतून उचलून अजीबात विलायतेस नेऊन ठेवण्याचें ठरविलें, आणि याविषयीं नारायणय्या यांनीं संमति दिल्यावर ता. ६ फेब्रुवारी रोज बिझांटबाई विलायतेस निघून गेल्या. ता. ७ व १५ फेब्रु. १९१२ रोजीं नारायणय्या यांनीं लक्ष्मण गड्यानें पाहिलेल्या लेटबीटरसाहेबांच्या कृत्या-विषयींची सविस्तर माहिती पत्रद्वारें बिझांटबाईंना कळविली.

पण आत्तांपर्यंत धिमेपणा पत्करून स्थिरस्थावर करणाऱ्या बिझांटबाईनीं ' इंडियन ओशन ' मधून पत्र लिहून नारायणय्यांस कळविलें कीं, " तुम्ही आतां अड्यार येथून निघूनच जावें हें बरें. तुम्ही आपल्या मुलांसंबंधानें अड्यार व बनारस येथें जें विधान केलेंत तें खरें असलें तरी दुसरा कोणताही बाप आपल्या मुलांसंबंधानें असलें विधान करण्यापेक्षां मरण पत्करता. पण हें तुमचें विधान खरें असतें तर तुम्ही अडयार येथून निघूनच गेलां असतां, आणि आपलीं मुलें तुम्हीं माझ्या ताब्यांत दिलींच नसतीं. तुमचे म्हणणें ज्या कांहीं सन्मान्य गृहस्थांच्या कानीं गेलें त्यांचें मत असेंच असून कोणत्याही न्यायाच्या कोर्टाचें मत-ही असेंच होईल. तुम्हीं मला लिहून दिलेला करारनामा आतां रद्द करूं पहाल तर मी असें सिद्ध करावयास तयार आहें कीं, मीं आपल्या ताब्यांत मुलें घेतलीं तेव्हां त्यांना पोटभर खावयास मिळत नव्हतें, त्यांना माराहाण केली जात होती, त्यांना घाणेरडें ठेवण्यांत येत होतें, आणि त्यांना नरकवासांत–एकसारखें तुमच्या धास्तींत–रहावें लागत होतें. आतां तीं मुलें निर्भय, मोकळीं व आरोग्यसंपन्न गृहस्थ बनलीं आहेत......आतां तुमच्यापासून आपलें संरक्षण करून घेण्यास समर्थ होईतों–पूर्ण वयांत येईतों–तीं मुलें हिंदुस्थानांत परत येणार नाहींत. "असें बिझांटबाईनीं स्पष्ट लिहिलें. ' पूज्य व प्रिय मातोश्रीं ' नीं जेव्हां आपलें हें खरें स्वरूप दाखविलें तेव्हां ' कर्तव्यनिष्ठ पुत्र ' नारायणय्या यांचे डोळे लक्कन उघ-

डले. लेडबीटरसाहेब एकाएकीं बनारस येथून अदृश्य झाले ते युरोपांत गेले होते; त्यांची व कृष्णमूर्ति आणि नित्य यांची गांठही तिकडे पडलीच. तेव्हां नाइलाज होऊन नारायणय्यांनीं मिसेस् बिझांट यांस स्पष्ट कळविलें कीं, ता. ३१ आगस्ट १९१२ चे आंत माझीं मुलें माझ्या हवालीं करा, नाहीं तर मला कायद्याचा अवलंब करावा लागेल.

## खटल्यास सुरुवात.

त्याप्रमाणें अखेर नारायणय्या यांनीं मिसेस् बिझांट यांचे विरुद्ध खटलाच दाखल करावा लागला. या खटल्यांत प्रतिवादी मिसेस् आनि बिझांट यांनीं एक जबाब प्रथम दाखल केला. त्यांत असें म्हटलें होतें कीं, " या फिर्यादीचे मुळाशीं राजकीय हेतु व व्यक्तिविषयक मत्सर असून प्रतिवादीस इजा पोहोंचविण्याचा उद्देश आहे. जहालांच्या कटांतून सामील होण्यापासून हिंदुस्थानांतील विद्यार्थि-वर्गाला परावृत्त करून साम्राज्यासंबंधाची निष्ठा त्यांच्यांत स्फुरित करण्याचा प्रयत्न प्रतिवादीनें केल्यामुळें प्रतिवादीचा जीव किंवा कीर्ति यांचा नाश करण्याचा कित्येकांनीं विडाच उचललेला आहे. लार्ड कर्झन हे हिंदुस्थानाचे व्हाइसरॉय असतांना मुलांच्या गुप्त कवाइती व हत्यारें गोळा करणें महाराष्ट्रांत चाललें होतें तें बंद करण्याचे कामांत प्रतिवादी पडल्यापासून, विद्यार्थ्यांमधील अत्याचाराच्या चळवळीस हा एक अडथळाच आहे असें ध्यानांत येऊन, तिचा जीव घेण्याची धमकी देण्यांत आली "..." वादी हा शरीरानें व मनानें दुबळा आहे. त्याला लोकांनीं बनविला आहे. माझ्या ताब्यांतून मुलें त्याच्या ताब्यांत दिलीं तर तीं मुलें इंग्रजांचा द्वेष करावयास शिकतील " असला मजकूर जबाबांत असून ब्रिटिश राज्य उलथविण्याच्या उद्देशानें केलेले जहालांचे कट, अमेरिकेंतील टिंगले बाई, डॉ. नाजुंडाराव व ' हिंदू ' पत्र यांनीं मिळून हें प्रकरण उपस्थित केलें असें बिझांट-बाईचें म्हणणें होतें. पण, या जबाबांत गैरलागू मजकूर घालून पाल्हाळ केला आहे; तेव्हां नवा जबाब लिहून दाखल करावा, असें कोर्टानें फर्माविलें; आणि हा हुकूम देतांना म्हटलें कीं, ' बिझांटबाईना अशा रीतीनें दशदिशा अवक्षेपण करण्याचें कांहीं एक प्रयोजन नव्हतें. '

## मि. नारायणय्या यांचें म्हणणें.

वादी मि. नारायणय्या यांनां दाखल केलेल्या फिर्यादींत म्हटलें होतें कीं, " मानवांचें अंगीं असतात त्याहून उच्च गुण प्रतिवादींत वसत आहेत, असा

वादीचा पूर्वी समज होता व प्रतिवादीला पूज्य मानून प्रत्यक्ष तसा मान तो देतही असे. पुढें प्रतिवादीला वादीच्या मुलांचे पालक नेमावें अशाबद्दल पत्र लिहून देण्याविषयीं प्रतिवादीनें वादीचें मन वळविलें; व १९१० सालच्या सुरुवातीस वादीनें तसें पत्र लिहून दिलें. पण, लेडबीटरसाहेब कृष्णमूर्तीला अयोग्य व भयंकर संवयी लावितात असें आढळून आलें. तेव्हां वादीनें प्रतिवादीजवळ तक्रार नेली; आणि प्रतिवादीनें लेडबीटर यांजपासून मुलांना दूर ठेवण्याचें वचनही दिलें; पण पुढें त्याप्रमाणें वर्तन केलें नाहीं. बनारस येथें वादीनें पुनः तक्रार केली; तेव्हां प्रतिवादी बाई म्हणाली, ' गेले कित्येक जन्म हीं मुलें व लेडबीटर एकत्र होते; आणि लेडबीटर ईश्वरप्राय सत्पुरुष आहेत; त्यांच्यापासून मुलांना दूर ठेवणें शक्य नाहीं. ' पण हें वादीला कबूल झालें नाहीं. वादीचा वडील मुलगा कृष्णमूर्ति हा ख्रिस्त आहे, अथवा तो मैत्रेयऋषि आहे किंवा होणार आहे, असें म्हणत असतात. या मुलाला देवता बनविण्यांत येत असून कित्येक सन्मान्य वाटणारे शिष्ट त्याच्यापुढें लोटांगणें घालतात व त्याचा इतर प्रकारें मोठा सन्मान करितात. शिवाय कृष्णमूर्तीच्या नांवानें खपणारें पुस्तकही लेडबीटर यांनींच लिहिलेलें असावें, असें मानण्यास कारण आहे. पालकाचे हक्क वादीनें प्रतिवादीच्या हवालीं केले तेव्हां वादी पूर्णपणें श्रद्धाळू, व प्रतिवादीवर सर्वथैव विश्वासून रहाणारा होता; म्हणजे अशा स्थितींत झालेला करारनामा अयोग्य वजन पडून ' झाला असें होतें व मग तो रद्द समजणें भाग होतें. फिर्याद लावण्याचे कामीं विलंब झाला; याचें कारण हेंच कीं, इतर कित्येकांप्रमाणें वादी हा प्रतिवादीला ईश्वर अंश असलेली विभूति मानीत होता, आणि आपल्या विनंतीला मान देऊन कबूल केल्याप्रमाणें प्रतिवादी मुलांना लेडबीटरपासून दूर करील अशी आशा वादीला वाटत होती. त्याचप्रमाणें प्रतिवादी परदेशीं गेल्यानेंही फिर्याद लावण्यास विलंब झाला. पण वादीचा सारा समज ता. ७ फेब्रुवारी १९१२ च्या प्रतिवादीच्या पत्रानें नाहींसा; झाला तेव्हां ही फिर्याद दाखल झाली. " असें वादी नारायणय्यांचें म्हणणें होतें.

## मिसेस बिझांट यांचें म्हणणें.

उलटपक्षीं प्रतिवादी मिसेस बिझांट यांनीं आपल्या जवाबांत म्हटलें होतें कीं, " कृष्णमूर्ति व लेडबीटर यांच्या संबंधीचें विधान खोटें व मत्सरानें केलेलें आहे. लेडबीटर यांच्या वर्तनासंबंधानें वादीनें कधीं तक्रार केली नाहीं; किंवा त्यांच्या

संगतींत मुलांना ठेवण्यासंबंधानें हरकत घेतली नाहीं. वादीनें आपल्या मुलांना दोन वर्षें त्यांच्या अगदीं निकट सहवासांत राहूं दिलें. वादी लेडबीटर यांच्याशीं सलोख्यानें वागत असे. ता. ३१ डिसेंबर १९११ रोजीं वादी प्रतिवादीकडे आला; आणि कांहीं एक कारण न सांगतां मुलांपासून लेडबीटर यांना दूर करा म्हणूं लागला, पण प्रतिवादीनें तें कबूल केलें नाहीं. ता. १९ जानेवारी रोजीं प्रतिवादीनें वादीला कांहीं मित्रांसमोर बोलावून आणिलें असतां, आतां करतो तसली तक्रार प्रतिवादीजवळ पूर्वी न केल्याचें वादीनें कबूल केलें होतें. त्याच-प्रमाणें वादीनें या प्रसंगीं मुलांना विलायतेस पाठविण्याविषयीं अनुमतिही दिली. लेडबीटरपासून मुलांना दूर ठेवण्याचें वगैरे कोणतेंही वचन प्रतिवादीनें वादीला या प्रसंगीं दिलें नाहीं. मि. लेडबीटर यांच्या वाईट खोडीसंबंधानें प्रतिवादीला बिल-कुल माहिती नव्हती. साहेब मजकुरांचें चरित्र पवित्र आहे असें त्यांच्या दानतीसंबंधें जो तेवीस वर्षांचा अनुभव आहे त्यावरून आणि त्यांनीं मुलांना सहाय्य केल्याबद्दल कित्येक मातापितरांनीं ज्या साक्षी दिल्या आहेत त्यांवरून, प्रतिवादी म्हणत आहे. सध्यां मुलें इंग्लंडांत ना. जेकब ब्राइट यांच्या विधवा स्त्रीच्या आश्रयाखालीं रहात असून त्यांचीं नांवें ' ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी ' त दाखल करण्यांत आलीं आहेत. त्यांना शिकविण्याकरितां ' सें. हिंदू कॉलेज 'चे प्रिं. अरंडेल यांची योजना केलेली आहे. मुलांनाही वादीकडे परत जाण्याची इच्छा नाहीं."

## खटल्यांतील साक्षी.

नंतर खटल्याचें काम चाललें. वादीतर्फे मि. सी. पी. रामस्वामी आय्यर हे वकील असून प्रतिवादी आपल्या तर्फेचें काम स्वतःच चालवीत होत्या. मुंबईचे मि. विमादलाल, मि. बर्ट्राम कीटले, बाबू भगवानदास, मि. विश्वास, वगैरे गृह-स्थांच्या साक्षीचें प्रकरण उपस्थित होऊन, मिसेस बिझांट यांना ' थिऑसॉफिस्टां ' कडून मिळणारी पूजा, मि. लेडबीटर यांची वर्तणूक, लेडबीटर यांनीं कृष्णमूर्ती-संबंधानें ' डियर ॲनी ' ला ( मिसेस् बिझांट यांस ) पाठविलेलीं पत्रें, ' विश्वाच्या उत्क्रांतीच्या मुख्य सूत्रधाराचें ' लेडबीटर व बिझांट यांना झालेलें दर्शन ( ? ), लेडबीटर यांचें ' परमेश्वर स्वरूपाच्या उंबरठ्यापर्यंत जाऊन पोहोंचलेला इसम ' असें करण्यांत आलेलें वर्णन, वगैरे विषय पुराव्यांत आले. बाबू भगवानदास

यांनीं आपल्या साक्षींत सांगितलें कीं, " ऑर्डर ऑफ धि स्टार इन् धि ईस्ट ' या पंथाचा फैलाव ' सें. हिंदू कॉलेज ' मध्यें जोरानें होत आहे हें वाईट आहे असें गाऱ्हाणें मिसेस् बिझांट यांचे जवळ करण्यांत आलें होतें. पण यांनीं या ' ऑर्डर ' चीं छापील पत्रकें विलायतेस तयार करून इकडे पाठविलीं. बिझांट-बाई या ' ऑर्डरच्या संरक्षक बनल्या. कृष्णमूर्ति हे या पंथाचे मुख्य आणि ' सें. हिंदू कॉलेज ' चे प्रिं. अरुंडेल हे व इतर प्रोफेसर आणि मास्तर हे त्यांचे निरनिराळ्या प्रकारचे सेक्रेटरी असल्याचें जाहीर झालें होतें. "

मि. धनकृष्ण विश्वास–हे ' सोसायटी ' च्या हिंदी शाखेचे १८९९ ते १९०७ पर्यंत अ. सेक्रेटरी होते–यांनीं आपल्या साक्षींत सांगितलें कीं, " लेडबीटरसाहे-बांनीं मुलांना उपदेश केला तो त्यांना सहाय्य व्हावें म्हणून केला, असें म्हणून बिझांटबाई त्यांचे समर्थन करीत होत्या. "

मुंबईचे मि. जे. जे. विमादलाल यांनीं आपल्या साक्षींत सांगितलें कीं, " कृष्णमूर्तीच्या गळ्यांत मुंबई येथें लोकांनीं पुष्पहार घालून त्याला बिझांटबाईच्या बरोबरीनें मान दिला. "

वादी नारायणय्या यांनीं सांगितलें कीं, " कृष्णमूर्ति याच्यासंबंधानें कांहीं तरी मोठी चांगली व महत्त्वाची गोष्ट होणार आहे, असें १९०९ सालीं बिझांटबाई मला म्हणाल्या; तेव्हां ' काय होणार आहे ? ' असा प्रश्न मीं केला असतां त्या मला म्हणाल्या, ' पुढें कळेल; पण तुम्ही मि. लेडबीटर यांच्या मार्गांत अडथळे मात्र आणूं नका. ' १९१० सालीं बाई मला म्हणाल्या, ' तुम्ही मला धार्मिक बाबतींत तुमचे गुरु मानिता. त्याचप्रमाणें ' मास्टरां'शीं माझें बोलणें चालणें होतें यावर तुमचा विश्वास आहे ना ? मग काय ? तुम्ही मला त्रास देणार नाहीं हें खरें; पण तुमच्या मृत्यूनंतर तुमचे आप्त तक्रार करतील असा संभव आहे. तेव्हां मुलांसंबंधानें पालकाचे हक्क मला लिहून द्या. तेव्हां मुलांचें विलायतेस शिक्षण होईल या आशेनें मीं तसें लिहून दिलें. मुलांना विलायतेस नेण्यासंबंधानें मीं अनुमति दिली; तेव्हां त्यांना लेडबीटर यांजकडे इटालींत नेतील अशी कल्पना देखील मला झाली नव्हती. "

अड्यार येथें मि. लेडबीटर व मि. नारायणय्या यांच्यांत एकदां शिवीगाळी झाली आणि लेडबीटर यांचें घाणेरडें कृत्य पाहिल्यासंबंधानें नारायणय्या हे १९१० च्या मे महिन्यांत म्हणाले होते, अशी साक्ष एस. व्ही. सुब्रह्मण्यं यांनीं दिली.

लक्ष्मण गव्यानें लेडबीटर व कृष्णमूर्ति यांना बहुतेक नग्न स्थितींत कसें पाहिलें यासंबंधानें साक्ष दिली.

मिसेस् बिझांट यांनीं आपल्या साक्षींत सांगितलें कीं, " लेडबीटर हे कृष्ण-मूर्तीला, नग्न होऊन इंग्रजी तऱ्हेनें स्नान कसें करावें हें शिकवीत होते, दुसरें कांहीं नाहीं. लेडबीटर हे पूर्वी ' पायोनिअर 'मध्यें लेख लिहीत असत. ते मोठे पवित्र गृहस्थ आहेत. कृष्णमूर्ति याला धर्मगुरु होण्यास योग्य असें शिक्षण दिलें जात असून नित्य यास ' आय. सी. एस. ' बनविण्याचा विचार आहे. मुलांना इंग्लंडला पाठविण्याविषयीं गोष्ट निघाली होती तेव्हां, त्यांना लेडबीटरपासून दूर राखण्याविषयीं नारायणय्या बोलले; पण मीं त्यांना सांगितलें कीं, ' तूर्त त्यांना दूर ठेवीन पण पुढेंही ते सदैव तसेच दूर रहातील अशाबद्दल मी वचन देऊं शकत नाहीं. ' मी मुलांकरितां २७००० रु. खर्च केले असून सालीना १०००० रु. खर्च करण्यासंबंधानें मीं व्यवस्था केली आहे. माझ्या मृत्युपत्रांत सुमारें ६०० पौंडांचें सालीना उत्पन्न मीं त्यांच्या नांवानें केलें आहे. ( वकिलांच्या प्रश्नास ) ' मास्तर ' हे मानवी सामर्थ्याबाहेर सामर्थ्य असलेले दिव्य पुरुष असून ते तिबेटांत असतात. या खटल्यांत पैशासंबंधानें वगैरे मला दुसऱ्यांकडून मदत होत आहे. माझें शरीर हजर नसलें तरी कृष्णमूर्तीच्या ' इनीशिएशन ' विधीचे वेळीं मी हजर होत्यें. मुलें ताब्यांत घेण्याचीं कारणें त्यासंबंधींच्या करारनाम्यांत घालण्याचें प्रयोजन आहेसें वाटलें नाहीं, म्हणून तीं त्यांत घातलीं नाहींत. कांहीं वर्षांनीं मैत्रेयऋषि हे कृष्णमूर्तींच्या शरीराचा उपयोग करतील. "

मि. लेडबीटर यांनीं आपल्या साक्षींत सांगितलें कीं, " कृष्णमूर्तीसंबंधानें व माझ्या संबंधानें केलेंलें विधान म्हणजे घोर असत्य होय. कृष्णमूर्ति यास मी सदैव पूज्य व सन्माननीय मानीत आलों आहें. ( वकिलांच्या प्रश्नास ) अतीं-द्रियज्ञान प्राप्त करून घेण्यासंबंधानें मीं व बिझांट यांनीं मिळून प्रयोग करून पाहिले मीं ज्ञानानें ग्रह पाहिले आहेत. ' उत्क्रांतीच्या सूत्रधाराला ' मीं पाहिल्याचें

सांगितलें होतें. मुलांना मीं कांहीं उपदेश पूर्वी केला होता. त्यासंबंधीचीं माझीं तींच मतें अद्याप कायम आहेत. मी या बाबीचा विचार केवळ प्राणिधर्मगुणांच्या दृष्टीनेंच करितों. पण मिसेस् बिझांट यांच्याकरितां मीं १९०६ सालापासून हा उपदेश सांगण्याचें बंद केलें. ' चर्च ऑफ इंग्लंड ' मधून मी हा उपदेश मूळ शिकलों. मुलांच्या विचारांचे प्रवाह कसकसे वहातात हें माझ्या दृष्टीला दिसतें. प्रेमाशिवाय झालेला विवाह व वेश्यागमन हीं दोनही माझ्या उपायाच्या मानानें कमी योग्यतेचीं होत. ( मिसेस् बिझांट यांच्या प्रश्नास ) स्त्रिया व वाईट मुलें यांच्या नादांत गुंतूं नये म्हणून मी मागें कांहीं तरुणांना कांहीं उपदेश सांगितला होता. "

## कोर्टास उद्देशून केलेलीं भाषणें.

मिसेस् बिझांट यांनीं कोर्टास उद्देशून भाषण केलें तेव्हां म्हटलें कीं, " माझीं मुलें —कृष्णमूर्ति व नित्य— हीं अत्यंत शुद्ध रत्नें आहेत. मि. लेड बीटर यांची कांहीं मतें त्यांच्या कानीं गेल्यानें त्यांची कांहीं हानि होणें नाहीं. हजारों सन्मान्य स्त्री-पुरुष लेडबीटर यांना पवित्र व निष्कलंक दानत असलेले धर्मगुरु मानितात, तेव्हां ते अनीतिमान माणूस आहेत, असें कोर्टानें मानूं नये. खटल्याचा निकाल वादीच्या बाजूचा झाल्यास कृष्णमूर्ति हा गुन्हेगार म्हणून डागला जाऊन, मि. लेडबीटर यांचें अवशिष्ट राहिलेलें आयुष्य कलंकित होणार आहे. आणि माझ्या संबंधानें म्हणाल तर, मी म्हातारी झालेली आहें; आणि मी मुलांची पालक होण्यांत अपात्र ठरलें गेलें तर हजारों स्त्री-पुरुषांचं धर्मगुरु होण्यास मी नालायक मानिली जाईन. तेव्हां कोर्टानें माझ्या बाजूचा निकाल द्यावा. "

वादीतर्फेचे वकील मि. सी. पी. रामस्वामी यांनीं कोर्टाला उद्देशून केलेल्या अखेरच्या भाषणांत म्हटलें कीं, " मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यास नारायणय्या हे तयार असून आत्तां सुरवातीस त्याबद्दल १०००० रु. ठेव म्हणून निराळे काढून ठेवण्यास ते तयार आहेत. कोर्टानें कोणाही योग्य व सन्माननीय गृहस्थाला मुलांचे मालक नेमावें. मुलांप्रीत्यर्थ बाईनीं २७००० रु० खर्च केले. या गोष्टीबद्दल कांहीं पुरावा पुढें आलेला नाहीं. मुलांना इकडे यावेसें वाटत नाहीं म्हणाल तर त्यांना कोर्टांत आणिलें नव्हतें, तेव्हां त्यांची इच्छा अमूकच आहे असें

धरून चालतां येत नाहीं. मुलांचें शिक्षण आजपर्यंत खाजगी तऱ्हेनेंच चाललें व पुढें तरी तीं ऑक्सफर्डमध्यें पाठविलीं जातील असें मानण्यास आधार नाहीं. धर्मगुरु बनणाऱ्या वडील मुलाला युनिव्हर्सिटीच्या पदवीची आवश्यकता नाहीं, असें बिझांटबाईच म्हणालेल्या आहेत. आपण परमेश्वरी विभूति असल्याची कल्पना मुलांच्या डोक्यांत शिरणें चांगलें नाहीं. प्रतिवादीसारख्या वयोवृद्ध माणसांनीं कृष्णमूर्तीसारख्या पोरास पूज्य मानावें, त्याला एका पंथाचें मुख्य बनवावें, आणि अरुंडेलसारख्यांनीं आपल्याला त्याचे सेक्रेटरी म्हणवावें, हें त्या मुलाच्या दृष्टीनें इष्ट कसें मानितां येईल ? यानें मानसिक व नैतिक दृष्ट्या मुलांची हानिच होणार आहे. हें प्रकरण कोर्टांत जाणार असें वाटलें तेव्हां प्रतिवादींनीं लक्ष्मणाचा एक जबाब लिहून घेतला. त्याचप्रमाणें लेडबीटर यांनीं नारायणय्यांना मुलांपासून दूर ठेवण्याचा प्रयत्न केला. ' इनीशिएशन् ' चा विधि झाला तेव्हां कृष्णमूर्ति अड्यार येथें होता, मिसेस बिझांट या बनारस येथें होत्या; आणि विधि तिबेटांत झाला म्हणतात ! असल्या विधानावरून कोणत्याही मृत्युलोकांतल्या कोर्टाला काहींच हुकूम सोडतां येणार नाहीं हें उघड आहे. लेडबीटर हे कृष्णमूर्तीला नुसतें इंग्रजी पद्धतीनें स्नान कसें करावें हें शिकवीत होते, असें मानतां येत नाहीं. सध्यां मुलांचें शिक्षण मि. जिनराजदास यांचेवर सोंपविण्यांत आलें असून त्यांचीं मतें लेडबीटरसाहेबांसारखींच आहेत. मुलांना योग्य शिक्षण देण्याचे ऐवजीं त्यांच्या डोक्यांत भलभलत्या कल्पना भरवून देण्यांत येत आहेत. तेव्हां मुलांना या परिस्थितींतून सोडविणें अवश्य आहे. ''

## खटल्याचा निकाल.

शेवटीं जस्टिस बेकवेल्ल यांनीं निकाल दिला कीं, " मिसेस् बिझांट यांनीं मुलें वादीच्या स्वाधीन करावीं, कोर्ट मुलांना आपल्या ताब्यांत घेत आहे; आणि खटल्याचें काम लांबून पैसा खर्च झाला तो वादीनें प्रतिवादीवर केलेल्या आरोपामुळें झाला असल्यानें आणि ते आरोप सिद्ध झाले नसल्यानें वादीनें दोनही बाजूंचा खर्च सोसावा. ज. बेकवेल्ल म्हाणाले कीं, " लेडबीटर साहेबांना प्रथमपासूनच नारायणय्या हा आपल्या मार्गांत एक अडथळा आहे असें वाटत होतें; आणि मुलें सर्वस्वीं आपल्या ताब्यांत घेण्याची त्यांची इच्छा होती. लेडबीटरसाहेबांवरील गुन्हा शाबीत झाला नाहीं. पण, त्यांचीं मतें

निःसंशय अनीतिमान म्हणावीं लागतात. असा माणूस मुलांना शिक्षण देण्याचे कामीं नालायख समजला जाईल. मुलांच्या सहवासांत असल्या माणसाला ठेवणें अत्यंत भयंकर आहे. मुलें इंग्लंडांत आहेत, व त्यांचेवर इकडील कोर्टाचा हुकूम कसा चालेल ? असें प्रतिवादीतर्फे म्हणण्यांत आलें. पण, मद्रास हायकोर्टाच्या हुकुमाची अंमलबजावणी करण्याचे कामीं इंग्लिश कोर्टाकडून सहाय्यच होईल अशाबद्दल खात्री वाटते. ”

## तात्पर्य.

अशा प्रकारें कृष्णमूर्तीच्या अवतारप्रवर्तनाचे खटपटींतून उपस्थित झालेल्या खटल्याचा निकाल झाला. मुलें ताव्यांतून गेलीं तरी तीं मोठीं झाल्यावर जातात कोठें ? आपल्याचकडे येणार, असें बिझांटबाईंना वाटत आहे; आणि सुखाच्या व बडेजावकीच्या मोहाला तीं बळी पडल्यास असें होणें अशक्यही नाहीं. पण खटल्याचा निकाल विरुद्ध झाला तरी बिझांटबाईचाच नव्हे तर ‘ सोसायटी ’ चा व ‘ थिऑसॉफी ’ चाही विजय झाला म्हणून कित्येक ‘ थिऑसॉफिस्ट ’ नाचूं लागले ! मिसेस् बिझांट यांना अभिनंदनपर तारा पाठवा म्हणून एका मुंबईकर ‘ थिऑसॉफिस्टा ’ नें पत्रव्यवहार करून ठेविलाच होता. इकडे ‘ सें. हिंदू कॉलेजां ’ त या अवताराच्या मागें लागलेल्या लोकांची डाळ नीटशी शिजेना. मि. अरंडेल यांनीं लिहिलेलें एक पत्र ‘ लीडर ’ पत्रांत प्रसिद्ध झालें. त्यांत त्यांनीं आपल्या पंथांतील बांधवांस म्हटलें होतें कीं, बिझांटबाईंना आपण परमेश्वरी विभूति मानतों व तिच्या मागून जाण्याचें आपण ठरविलें आहे; तेव्हां त्यांनीं कांहींही केलें किंवा त्यांच्यांत कोणतेही दोष असले तरी आपण तिकडे लक्ष देण्याचें कांहीं कारण नाहीं. त्यांच्यासंबंधानें बऱ्यावाइटाचा निवाडा करीत न बसतां त्यांच्या इच्छेप्रमाणें आपण वागलें पाहिजे. हें पत्र प्रसिद्ध होतांच संतापून जाऊन ‘ सें. हिंदू कॉलेजां ’तील बिझांटभक्त प्रोफेसरांनीं आपल्या जागांचे राजीनामे दिले. एवढेंच नव्हे तर त्यांच्या गुरुमातेनें खुद्द बनारस येथेंच एक नवीन कॉलेज स्थापून ‘ सेंट्रल हिंदू कॉलेजा ’ शीं स्पर्धा सुरू करण्याचीही तयारी केली आहे. पत्रांतील मजकूर जर खरा तर तो जगासमोर आल्याबद्दल या लोकांच्या अंगाची इतकी लाही कां व्हावी, हें समजणें मोठें कठिण आहे. एवढेंसें कोवळें पोर तें काय, पण त्याच्या पूर्वजन्मींच्या गोष्टी पुढें मांडून त्याला गुरु

करण्याचा प्रयत्न झाला. चुंबकत्व आणिलेले ( मॅग्नेटाइज्ड )? तारे व फिती छातीवर लटकवून त्याचे आजोबा किंवा आजीबाई शोभणाऱ्या माणसांनीं त्याची पूजा करण्यास व त्याचे देव्हारे माजविण्यास सुरुवात केली; तेव्हां याच्या बुडाशीं अज्ञान किंवा पाजीपणा याखेरीज कांहीं असण्याचा संभव नाहीं—निव्वळ अज्ञान असलें तरी तें उपेक्षणीय नाहीं—असें लोकांच्या लक्षांत आलें; आणि बुद्धि व वाणीच्या जादूनें कित्येक वर्षे भारलीं गेलेलीं कित्येक माणसें जागीं झालीं व डोळे चोळून आजूबाजूस पाहूं लागलीं. आपल्या शरीरापेक्षां आपलीं मनें विकणें किंवा मूर्खपणानें तीं दुसऱ्याच्या सर्वस्वीं हवालीं करणें अंतीं कसें हानिकारक ठरतें, हें ध्यानांत आल्यामुळें कित्येक जुन्यापुराण्या ‘ थिऑसॉफिस्टां ’नीं विझांट-बाईचा उघड निषेध केला; आणि कित्येकांनीं तर ‘ सोसायटी ’ सही राम राम ठोकला. ‘ सोसायटी ’च्या सभासदांची संख्या आतां कांहीं हजारांनीं कमी झालेली आहे म्हणतात. विझांटबाईकरितां कॉलेज सोडणाऱ्या प्रोफेसरांची ‘ थिऑसफी ’ किंवा ‘ लोकशिक्षण ’ यांसंबंधीची चाड व्यक्तिनिष्ठेपेक्षां कनिष्ठ आहे असें सिद्ध झालें, आणि धार्मिक व अवतारी म्हणविणारीं माणसें राजकीय वातावरणाचा फायदा घेऊन प्रतिपक्षीयांवर धडधडीत खोटे आरोप करण्यास कशीं मागेंपुढें पहात नाहींत याचा मासला जगा-पुढें आला. धर्मप्रवर्तन करावयास निघालेले लोक सर्वसाधारण माणसांप्रमाणेंच डावपेंच कसे लढवितात, व्यवहार करितांना सौजन्य किंवा सत्य यांपेक्षां उपयुक्तते-कडेच त्यांची दृष्टि कशी असूं शकते, त्याचप्रमाणें तोंडानें उच्च तत्त्वांचा बोध करणाऱ्या धार्मिक विभूति सारासार विचारावर निखारा ठेवून, अहंकारानें सर्व गोष्टी वेळीं कशा करूं लागतात याचा दाखला या विझांट-प्रकरणानें सर्वांस उप-लब्ध झाला आहे. लेडबीटरसारख्या माणसाच्या नादीं लागून त्याला आसरा दिल्यानें विझांटबाईवर आज नाचक्कीचा प्रसंग आला आहे. तरी पण, ‘ स्टार ऑफ धी ईस्ट ’ मधील कांहीं लोक ख्रिस्ती पाद्र्यांसारखे आवाज काढीत अवता-राच्या गोष्टी सांगतच आहेत; आणि ‘ थिऑसॉफी ’ ही राजकीय आकांक्षेलाही सहाय्यक असल्याचेंही प्रतिपादन होतच आहे. पण तें कांहींही असलें तरी हट्टानें, कित्येक थिऑसॉफिस्टांच्या इच्छेविरुद्ध, लेडबीटर यांस ‘ सोसायटी ’त घेतलें, त्यांना ‘ सोसायटी ’त महत्त्वाचे जागीं ठेविलें, त्यांच्या तंत्रानें वागून

अवतार उत्पविण्याचें काम चालविलें, व ' हिंदु ' पत्राचे संपादक किंवा डॉ. नायर यांच्यासारख्यांवर या संबंधांत अब्रू बिघडविल्याचा आरोप ठेवून खटले केले, त्यामुळें सारी घाण बाहेर पडून बिझांटबाईविषयीं आतां जें लोकमत झालें आहे तें लवकर नाहींसें होणें आतां दुरापास्त आहे. त्रिकालाबाधित सत्य तत्त्वें अर्थात् कायमच आहेत; पण तीं विवक्षित तऱ्हेनें सांगणाऱ्या माणसांच्या अधिकारानुरूप त्यांचा परिणाम लोकांवर होत असतो. मि. लेडबीटर यांचा ' डिअर ॲनी '-शीं झालेला पत्रव्यवहार वाचून कोणासही या धार्मिक विभूतीविषयीं मोठा आदर वाटेलसें वाटत नाहीं. हीं पत्रें शक्य असेल त्यांनीं अवश्य वाचून पहावीं. तीं या खटल्याच्या हकीकतींत प्रसिद्ध झालीं आहेत. श्रद्धेसही सीमा असते. लोकांच्या धर्मभोळेपणावर किती बोजा टाकला तर चालेल याचा विचार न करितां 'विदुषी' व ' योगिनी ' बिझांटबाई वागल्या; आपल्या बुद्धिमत्तेवर व कर्तबगारीवर त्यांनीं फाजील भरंवसा ठेवला; आणि म्हणून त्यांच्या कृत्यांचें खरें स्वरूप लोकांच्या लक्षांत आज विशेष स्पष्टपणें आलें आहे; आणि या कामीं व्यावहारिक धूर्ततेवर अहंकाराचें वर्चस्व मिसेस् बिझांट यांनीं होऊं दिलें हें शेवटीं त्यापासून झालेल्या सत्याच्या आविष्करणाच्या दृष्टीनें इष्टच झालें यांत संशय नाहीं. हें प्रकरण अत्यंत बोधप्रद झालें आहे. मादक पदार्थांच्या सेवनानें मति भ्रमते पण ती थोडा वेळ; त्या मानानें अंधश्रद्धेची गुंगी ही किती तरी ज्यास्त चढते व टिकते. मादक पदार्थांचें सेवन केलेच्या माणसाला मध्यें मध्यें तरी आपण व्यसननिमग्न झालों असल्याची आठवण होते. पण अंधश्रद्धेची मदिरा प्राशन करणाराला आलेली गुंगी अभिमानास्पदच वाटत असल्यामुळें ती वाढतच जाते; आणि तिचा भर लवकर संपणें शक्य रहात नाहीं. सुशिक्षित म्हणविणारेही विवक्षित क्षेत्रांत विवक्षित शब्दांनीं गुंगतात. तेव्हां बुद्धि स्थिर व शाबूत ठेवून, डोळे व कान उघडे ठेवून विचार जागृत राखण्याची आवश्यकता किती आहे, हें या प्रकरणांत प्रसिद्ध झालेल्या अंधश्रद्धेच्या मासल्यावरून दिसून येतें. आणि हें तत्त्व जर या प्रकरणामुळें लोकांच्या विशेष लक्षांत आलें तर तें उपस्थित झालें–जो हो रहा है वो सब् अच्छेके वास्ते–असें म्हणण्यास कोणतीच हरकत रहाणार नाहीं.